Vol III Issue X April 2014 ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# *Golden Research Thoughts*

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest,Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.net**

Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 2.2052(UIF)
Volume-3 | Issue-10 | April-2014
Available online at www.aygrt.isrj.net

GRT

# मध्ययुगीन काव्यप्रकारांचा चिकित्सक अभ्यास

माधव बसवंते

**सारांश :-**

मध्ययुगीन कालखंडात प्रामुख्याने संत, पंडित आणि शाहिरी परंपरा महत्त्वाच्या आहेत. साधारणतः अकराव्या शतकापासून ते पेशवाईच्या अस्तापर्यंतच्या कालखंडास मध्ययुगीन कालखंड म्हणतात. संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम, संत जनाबाई, संत चोखामेळा हे सर्व संत समाजाच्या विविध स्तरातील होते. या सर्व संतांनी आपल्या साहित्यातून समाजातील जातियता, विषमता, अंधश्रद्धा, अनिष्ट रूढीपंरपरा यावर घणाघती प्रहार करीत समाजाला लोकशिक्षण दिले.

## प्रस्तावना :

ओवी, अभंग, पद, आरती, गौळण, भारूड, श्लोक, पोवाडा, फटका यासारख्या अनेक साहित्याच्या माध्यमातून त्यांनी समाजाचे प्रबोधन केले. त्याचबरोबर ईश्वर आणि भक्त यांच्यामधील नातेसंबंधही शब्दबद्ध केले आहेत. मध्ययुगीन पंडितांनी श्लोक आणि आख्यान काव्यप्रकारामध्ये गेयतायुक्त लेखन केले आहे. तर शाहिरांनी लावणी, पोवाडा, फटका, भूपाळी, झगडा या रचनांच्या माध्यमातून शाहिरांनी अध्यात्म, बौद्धिक, शृंगार आणि वीररसांचा आविष्कार केला.

## मध्ययुगीन कालखंडातील साहित्य

### ओवी

प्रारंभीच्या कालखंडात अनेक कवींनी ओवी व अभंग या छंदात रचना केल्याचे दिसून येते. ओवी व अभंग हे मराठीतील प्राचीन छंद असून हे दोन्ही छंद ओवी या नावाने ओळखले जातात. चार चरणांची रचना म्हणजे ओवी होय. रचनेच्या या पहिल्या तीन चरणात यमक आवश्यक असते. तर चौथा चरण लहान असतो.

ओवीच्या पहिल्या तीन चरणात आठ–आठ अक्षरे आणि शेवटच्या चरणात सात अक्षरे असावीत असा सर्वसाधारण नियम असला तरी तो पाळला जातो याची शक्यता नसते. काही संतांनी व कवींनी ओवींची छंदात रचना केली असली तरी संत ज्ञानेश्वरांची ओवी ही बंधनमुक्त असल्याचे दिसून येते.

### अभंग

ओवीच्याच मालिकेला अभंग म्हणण्याची प्रथा असली तरीही अभंगाची परंपरा प्रकर्षाने जाणवते. अभंगाच्या रचनाविषयी संत नामदेव माहिती देताना म्हणतात की, 'बावीस अक्षरांचे साडेतीन भाग तीन चरणातील अठरा अक्षरे. चौथ्या चरणातील चार अशी बावीस अक्षरे मिळून एक चौक, असे सहा चौक म्हणजे एक अभंग' असे असले तरीही मात्र स्वतः संत नामदेवांनी आपल्या अभंगरचनेत अक्षरांच्या आणि चौकांच्या संख्येचे बंधन पाळल्याचे दिसून येत नाही. तर त्यांच्या अभंगरचनेत एखादे अक्षर जास्त किंवा कमी आणि चौक चार किंवा आठ अशी अक्षरसंख्या दिसून येते.

अभंग हा प्राचीन मराठी छंद असून अभंगाच्या या प्रकारात देवद्वार अथवा मोठा अभंग व देवीदार अथवा लहान अभंग असे अभंगाचे दोन प्रकार आहेत. देवद्वार अर्थात मोठ्या अभंगात तीन सहा अक्षरी चरण आणि चौथा चरण चार अक्षरी असते. देवद्वार अभंग प्रकारात प्राचीन संत कवींनी अभंगरचना केली आहे. त्याचबरोबर गोविंदाग्रज, माधव ज्यूलियन, विंदा करंदीकर, मर्ढेकर, मधुकर केचे इत्यादी कवींनी या छंदामध्ये काव्यलेखन केले आहे. देवीवर या लहान अभंग रचना प्रकारात आठ अक्षरी ओळींची जोडी असते. या प्रकारात संत ज्ञानेश्वरांचे अभंग आहेत. संतांनी आपल्या अभंग रचनेतून ईश्वर, भक्तीभाव व भक्ताच्या अंतःकरणाची तळमळ यासारख्या भावना व्यक्त केल्या आहेत.

*पद*

एखादी स्फुटरचना म्हणजे पद. पद म्हणजे चरण. शास्त्रीय संगीताचा बाज लोवून अवतरलेली गेय रचना म्हणजे पद होय. ज्या रचनेचा विषयदेव, देवतापर म्हणजे पारलौकिक आहे, जिची जडण—घडण कलापूर्ण असून ती गेयपूर्ण असते त्या रचनेला पद ही संज्ञा लावावी असे डॉ. गंगाधर मोरजे यांनी म्हटले आहे. ही पदरचना प्रामख्याने संगीत नाट्यामध्ये दिसून येते. त्याचप्रमाणे कवी भा.रा. तांबे यांनीही काही पदे लिहिली आहेत.

*आरती, स्तोत्र व विरहिणी*

कोणत्याही भक्ताची आर्त मनोवृत्ती व मनोभावना आरतीच्या माध्यमातून दिसून येते. आरती हा शब्द 'आर्त'पासून तयार झाला आहे. पंढरपूरच्या विठ्ठलरूप वर्णनातून अनेक संतांची आरती प्रकट झाली आहे. म्हणजेच आरती ही ईश्वराची प्रार्थना असते. एखाद्या पूजेच्या आरंभी किंवा शेवटी आरती म्हटली जाते. त्याचबरोबर मंगलमयप्रसंगी आरती म्हणण्याची प्रथा दिसून येते.

स्तोत्र हे मंत्रमय असून त्यात परमेश्वराची स्तुती व मंत्रात्मक रचना असते. म्हणूनच साधारणतः परमेश्वराची स्तुती असलेली मंत्रात्मक रचना म्हणजे स्तोत्र होय. स्तोत्र सकलारिष्टापासून रक्षण करते अशी समाजात धारण दिसून येते. अशा मंत्राने मंतरलेले भस्मही रक्षण करू शकते, म्हणून भस्मालाही रक्षा असेही म्हणतात.

भक्ती आणि प्रीती या भक्तीचा उत्कृष्ट आविष्कार म्हणजे विरहिणी होय. संत ज्ञानेश्वरांच्या अनेक अभंगातून विविध भाववृत्तींचा आविष्कार दिसून येतो. प्रेमभावना हा परमेश्वर भक्तीचा उत्कृष्ट आविष्कार व भक्तीचे एक रूप असते. प्रेम, अनुराग, मीलन, विरह यासारख्या अनेक भावांचा आविष्कार अभंगातून व काव्यातून व्यक्त होतो.

*गौळण, भारुड, भूपाळी*

गौळणीत शृंगार असून संत एकनाथांच्या गौळणीतून गोपींचा श्रीकृष्णाचा भक्तीभाव प्रभावीपणे व्यक्त झाला आहे. या गौळणीत श्रीकृष्णाच्या बालरुपाविषयीचे वात्सल्यरूप व्यक्त झाले आहे. संत एकनाथांनी आपल्या गौळणीतून परस्परानुरक्त स्त्री—पुरुषांचे रूपक आणि स्वतःच्या मनातील भक्तिभाव व्यक्त केली आहे. यमुनातीरावरील कृष्णाचा विटीदांडू, लपंडाव, चेंडूफळी, पटपट सावली यासारख्या खेळांवर एकनाथांनी अध्यात्मपूर्ण रूपके रचली आहेत. त्याचबरोबर त्यांनी आपल्या गौळणीमध्ये शृंगाराचा रंग भरून त्यात अध्यात्माची किनारही जोडली आहे.

वेदकाळात भारुडं हा एक गीतप्रकार होता. भारुडं या संस्कृत शब्दावरून भारुड हा शब्द आला असावा असे समीक्षकांचे म्हणणे आहे. बहुरुढ ते भारुड होय. म्हणून भारुड हा केवळ वाचावयाचा किंवा गावयाचा काव्यप्रकार नसून तो सादरीकरणाचा प्रकार आहे. मनोरंजनाबरोबर लोकशिक्षण देण्यासाठी संत ज्ञानेश्वर, संत नामदेव व संत एकनाथांची भारुडाची रचना केली आहे. अशा प्रकारची भारुडे म्हणजे तत्कालीन लोकजीवनाचे आणि लोकसाहित्याचे दर्पणच म्हणावे लागते. संतांनी आपल्या भारुडातून मनोरंजनाबरोबरच परमार्थाची भाषाही शिकविली. संत एकनाथकालीन समाज जीवनातील चालीरिती, सण—उत्सव, कुटुंबव्यवस्था, ग्रामजीवन, समाजव्यवस्था, श्रद्धा, अंधश्रद्धा यांचे दर्शन भारुडातून घडते. एकनाथांचे प्रत्येक भारुड म्हणजे लांबलचक रुपक असते. वासुदेव, डोंबारी, गारुडी, फकीर, दरवेश, वैदू, जागल्या यासारख्या अनेक पात्रांच्या माध्यमातून एकनाथांनी समाजप्रबोधनच केले. शृंगार, विनोद, मानवी स्वभावाची विविधता, व्यक्ती, प्रसंग, बदलणारी भाषा, नाट्यानुकूलता, गेयता आणि अध्यात्मनिवेदन ही नाथांच्या भारुडाची वैशिष्ट्ये आहेत.

जगाला झोपेतून उठविण्यासाठी म्हणावयाचे सुंदर गाणे म्हणजे भूपाळी होय. अशा या भूपाळीमध्ये प्रातःकाळचे सुंदर वर्णन दिसून येते. भूपाळीत चंद्रकांत जातीची लक्षणे प्रामख्याने दिसून येतात. शाहीर होनाजी बाळांनी आपल्या भूपाळीतून श्रीकृष्णाला जागे करण्यासाठी प्रार्थना केली आहे.

*श्लोक*

श्लोक म्हणजे पद्यबंध होय. विशिष्ट अक्षरसंख्येचे गट अथवा लगत्वाचे अक्षरगट एकत्र जोडून श्लोकरचना प्रारंभ झाल्याचे दिसून येते. श्लोक चतुष्पाद किंवा चतुष्पदी असते. श्लोकातून परमेश्वरविषयक भक्तिची अथवा भेटीची तळमळ दिसून येते. ओजस्वीता, अस्खलितता, प्रवाहीपणा, स्फूर्तिप्रदता हे श्लोकाचे विशेष गुण आहेत. समर्थ रामदासांनी आपल्या अनेक श्लोकांतून मानवी मूल्यांची शिकवण दिली आहे.

*आख्यान काव्य*

रामायण, महाभारत किंवा पुराणातील एखाद्या निवडक कथेचा भाग निश्चित करून तो रंगवून सांगितला जातो तेव्हा त्यास आख्यानकाव्य म्हणतात. अनेक पिढ्यांचा जीवनपट, समाजाचे वर्णन निसर्गाच्या अवस्थांचे वर्णन अशा अनेक प्रकारचा आशय या काव्यातून व्यक्त होत असतो. आख्यानकाव्यापुढे संस्कृतमधील महाकाव्यांचा आदर्श असला तरी या दोन्ही रचनाप्रकारांमध्ये खूप मोठे अंतर असल्याचे दिसून येते. प्रबळ भावना व उत्कटता ही आख्यानकाव्याची वैशिष्ट्ये असून लोकाभिमुखता, नाट्यमय प्रसंग चित्रणाचे सामर्थ्य, स्वतंत्र कल्पनाविलास क्षमता, वृत्तीतील प्रेमळपणा व वाणीतील सोज्वळता हे आख्यानकाव्याचे विशेष गुण आहेत.

### लावणी

लावणी हा पेशवाईत प्रसिद्ध पावलेला एक शाहिरी रचना प्रकार होय. लावणी हे एक लोकगीत आहे. शेतात लावणी करताना जे गीत म्हटले जाते ते लावणी अशी या शब्दाची व्युत्पत्ती आहे. जी हृदयाला चटका लावते ती लावणी असे कोल्हटकरांनी म्हटले आहे. तर विशिष्ट ढंगाने म्हटलेली खटकेबाज व सफाईदार पद्यावर्तनी वा भृंगावर्तनी जातिरचना म्हणजे लावणी असे म.वा. धोंड यांनी म्हटले आहे. अनेक शाहिरांनी पोवाडा आणि लावणी या पद्यरचना प्रकारात वीररस आणि शृंगाररसयुक्त कविता लिहिली आहे. वीरपुरुषांचे पराक्रम हे पोवाड्याचे विषय, तर सुंदर स्त्रीचे सौंदर्य व प्रेम हे लावणीचे विषय आहेत. पादाकुलक व चंद्रकांत या जातिवृंत्तातमध्ये यांची रचना करण्यात आली आहे. लावण्यांमध्ये प्रेमभावना व सौंदर्यभावना असते. सामाजिक जीवनातून लावण्या निर्माण झाल्याअसून त्या केवळ लोकरंजनासाठी रचण्यात आल्या. यामुळे या लावण्यांतून मराठी संस्कृतीचे अस्सल दर्शन घडते. मध्ययुगीन लावणी ही शृंगारात अधिक रमतांना दिसून येते, तर आधुनिक काळातील लावणीत सामाजिक वास्तवाचे भेदक चित्रण व कारुण्यभाव अधिक प्रमाणात दिसून येतो. पोवाडे आणि लावणींचे विषय आणि त्यांच्या मांडणीचा ढंगही भिन्न भिन्न स्वरूपाचा असल्यामुळे हे दोन्ही स्वतंत्र वाङ्मयप्रकार मानले पाहिजेत असे समीक्षकांचे म्हणणे आहे.

### पोवाडा

स्तुती करणे ही कल्पना आर्य संस्कृतीतील पुरातनकाळापासून चालत आली आहे. प्र+वह म्हणजे ठासून स्तुती करणे. पोवाडे म्हणजे वीरांचे पराक्रम, विद्वानांची बुद्धिमत्ता, सामर्थ्य, त्यांच्या गुण व कौशल्याचे वर्णन किंवा स्तुती करणे. म.ना. सहस्त्रबुद्धे यांनी पोवाड्यास कीर्तिकाव्य म्हटले आहे. तर वि.का. राजवाडे यांनी पोवाडा हे केवळ श्राव्यकाव्य नव्हे, ते दृश्यकाव्यही आहे असे म्हटले आहे. पोवाडे पराक्रमी व कर्तृत्ववान व्यक्तीच्या जीवनावर आधारीत असून त्यात त्या पराक्रमी व्यक्तीच्या आदर्शाची पूजा केली जाते. तसेच पोवाड्यातून वीरत्वाला आणि राष्ट्रीय भावनेला आवाहन केले जाते. राजकीय इतिहासापेक्षाही तत्कालीन सांस्कृतिक जीवनाचे प्रतिबिंब पोवाड्यातून दिसून येते. अशा प्रकारचे पोवाडे हे प्रामुख्याने कथनपर असतात.

### कटाव

यमक असलेली मुक्तरचना म्हणजे कटाव होय. कटाव या मुक्तरचनेला कटिबंध असेही म्हणता येते. ही रचना पादाकुलक जातीसारखी असते. कटावाच्या रचनेत सर्वसाधारणपणे चार चार ओळींचे एक कडवे मानले जाते. या रचनेतील कडव्यांची रचना ही धावती असते. कटाव या रचना प्रकारात कवी अमृतराय व कवी नरहरी यांनी लेखन केले आहे.

### फअका

समाजातील चालिरिती आणि मनुष्यस्वभाव यांचे मार्मिक आणि भेदक चित्रण करीत आपल्या मूल्यांचे दिग्दर्शन करणारी काव्यरचना म्हणजे फटका होय. या रचनेत आठ आठ मात्रांचे तीन गट आणि शेवटी सहा मात्रा प्रत्येक ओळीत असे दोन ओळींचे म्हणजे साठ मात्रांचे ध्रुवपद असते. फटक्याचा अंतरा बालानंद जातीतील चौदा मात्रांचा असतो. माधवराव पटवर्धन यांनी पटक्याचा समावेश हरिभगिनी जातीवृत्तात केला आहे. फटक्याची चाल वापरून कवी केशवसुतांनी काही प्रमाणात काव्यलेखन केले आहे.

### झगडा

भेदिक फडातील शाहिरांचे सवाल जबाब म्हणजे झगडा किंवा जबाब होय. अशा भेदिक स्वरूपाच्या फाडत कलगी पक्षाचे शाहीर यांची चुरस असते. या चुरसीतील प्रश्नाला पूस तर उत्तराला टोक असे म्हणतात. या रचनाप्रकारातून संघर्ष आणि एका प्रकाराचे नाट्य निर्माण होते. याच भेदिक फडातून प्रश्न विचारण्याचा ढंग तमाशाने अनुकरण केल्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणूनच तमाशाला भेदिक फडाची देणगी लाभली आहे असेही म्हटले जाते.

### निष्कर्ष

1.मध्ययुगीन कालखंडात प्रामख्याने संत, पंडित आणि शाहिरी परंपरा असून साधारणतः अकराव्या शतकापासून ते पेशवाईच्या अखेरपर्यंतच्या कालखंडाला मध्ययुगीन कालखंड असे म्हणतात.
2.ओवी, अभंग, पद, आरती, स्तोत्र, विरहिणी, गौळण, भारुड, श्लोक यासारख्या काव्यप्रकारांच्या माध्यमातून संतांनी भक्त आणि ईश्वर यांच्यातील नातेसंबंध शब्दबद्ध करीत समाजातील जातियता व विषमता यांचा प्रखर शब्दात विरोध करीत समाजाला अध्यात्माद्वारे लोकशिक्षण दिले.
3.श्लोक व आख्यानकाव्याच्या माध्यमातून पंडितांनी समाजाला बौद्धिक ऊर्जा दिली.
4.पोवाडा व लावणीच्या माध्यमातून अनेक शाहिरांनी वीरांच्या पराक्रमाचा व त्यांच्या प्रखर बुद्धिमत्तेचा गौरव करीत त्यांच्या कर्तृत्वाचे दर्शन समाजाला करून दिले जाते.
5.संत ज्ञानेश्वरांच विरहिणीतून भक्ती आणि प्रीती या दोन भाववृत्तींचे दर्शन होते.
6.ओजस्विता, अस्खलितता, प्रवाहीपणा, स्फूर्तिप्रदता हे श्लोकाचे विशेष गुण आहेत.

7.मध्ययुगीन लावणी ही शृंगारात रमलेली आहे, तर आधुनिक लावणी सामाजिक वास्तवाचे भेदक चित्रण करताना दिसून येते.
8.मध्ययुगीन कालखंडातील काव्यनिर्मितीची प्रेरणा ही प्रामुख्याने आध्यात्मिक व पारमार्थिक असल्याचे जाणवते.

### *संदर्भग्रंथ*

1.म.वा. धोंड, मराठी लावणी
2.श्री.रं. कुलकर्णी, ओवी ते लावणी
3.डॉ. प्रकाश मेदककर, डॉ. भास्कर शेळके (कविता)
4.ह.श्री शेणेलीकर, प्राचीन मराठी वाङ्मयाचे स्वरूप
5.ल.रा. नसिराबादकर, प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.net